# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-२१८ दिनांक - ०६/०६/२०२४

**अनाधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या ०९ महिला बांगलादेशी नागरिकांवर आणि राहण्यासाठी सहारा देणाऱ्यावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.**

दिनांक ०५.०६.२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना त्यांच्या खास बातमीदारामार्फत रुम नं. ००२ विश्राम शांतीनगर को.ऑप.हौ.सोसायटी, सेक्टर नं. ०४, नयानगर मिरारोड पुर्व, रुम नं. २४, बिल्डींग नं. सी/२२ राजश्री को.ऑप.हौ.सोसायटी, शांतीनगर, सेक्टर नं. ०४ मिरारोड पुर्व, न्यु मिरा पॅराडाईस बिल्डींगचे पाठीमागील झोपडपट्टी, गितानगर, नयानगर मिरारोड पुर्व व अस्मीता बिल्डींगचे समोरील बिल्डींगमध्ये नयानगर, मिरारोड पुर्व या ठिकाणी विनापरवाना बांगलादेशी नागरीक राहत असल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस पथक, पंच व दुभाषिक यांचेसह वरील नमुद ठिकाणी साफळा रचुन ०९.०५ वा. ते ११.४५ वा. दरम्यान छापा टाकुन ०९ महिला बांगलादेशी ताब्यात घेवुन त्यांचेकडे विचारपुस करुन त्यांनी ते बांगलादेशी नागरीक असल्याचे कबुली दिल्याने तसेच बांगलादेशी नागरीक असल्याचे माहित असतांना देखील त्यांना यातील एका महिलेने व पाहिजे आरोपी यांनी नमुद बांगलादेशी महिलांना बेकायदेशीर वास्तव्यासाठी त्यांचे ताब्यातील घरात भाडेतत्वावर राहण्यास दिले म्हणुन त्यातील ०१ महिला आरोपी हिस ताब्यात घेवुन असे ताब्यातील १० महिलांवर व पाहिजे आरोपी यांचेविरुध्द मपोशि/अश्विनी भिलारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नयानगर पोलीस ठाणे गुन्हा क्र. २७३/२०२४, पासपोर्ट (भारतात प्रवेश) अधिनियम १९२० चे कलम ३, ४ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७,१३,१४-अ (ब) प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, मा. सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाचे पोनि समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, रामचंद्र पाटील, शिवाजी पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/केशव शिंदे, पोशि/चेतनसिंग राजपुत मपोशि/अश्विनी भिलारे, मपोशि/शितल जाधव, चा.पोहवा/सम्राट गावडे व महिला मसुब अश्विनी वाघमारे सर्व नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.